# Socio-legal dimensions of ‘live-In relationship’ in India

Dr. Swarupa N. Dholam *

**Abstract :**

The article deals with the socio-legal Dimensions of Live-In relationship in India. Live-In Relationship has been one of the most controversial legal topic in the instant past. The aspects of Live-in relationship was not very clear in India until the Hon’ble Supreme Court gave its landmark judgment in **D Veluswamy Vs D Patchaiammal on 21st October, 2010 about 'relationship in nature of marriage' under Protection of Women from Domestic Violence Act, 2005.** *The whole notion of live in relationship is not as simple as it appears, but is multi-dimensional bringing along with it many issues and complications.*

In India there exists only one kind of relationship between an unrelated couple of a male and female. The said social union is termed as “Marriage”, which is more of a sacrament and a divine concept and is practiced as a ritual since ages. But for number of reasons this concept is loosing its divineness. Love can not be the only reason to marry, sometimes marriages are forced on couples. Therefore a live in relationship introduced in society as a substitute for marriage. But nowdays it is no more substitue, it is having its own stand in society and in law of the country.

# भारतातील सहजीवन नातेसंबंधाचा सामाजिक व कायदेशीर दृष्टीकोन

डॉ. स्वरूपा ना. ढोलम *

**गोषवारा** –

प्रस्तुतचा लेख हा भारतातील सहजीवन नातेसंबधाचा सामाजिक व कायदेशीर दृष्टीकोन याबाबत आहे. मागील काही कालावधीमध्ये सहजीवन नातेसंबध हा कायदेशीर स्तरावर वादग्रस्त मुद्‌दा ठरला होता. मा. सर्वोच्च न्यायालयातर्फे डि वेलुस्वामी विरूध्द डि पत्चैम्मल मध्ये दिनांक २१/१०/२०१० रोजी कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५ मधील विवाह स्वरूपातील नातेसंबंध या संज्ञेविषयी मार्गदर्शक तत्वे देण्यात आली. तोपर्यंत सहजीवन नातेसंबधा विषयीचा न्यायीक दृष्टीकोन हा भारतामध्ये सुस्पष्ट नव्हता. सहजीवन नातेसंबध ही संकल्पना जशी प्रतीत होते, तशी ती स्पष्ट नाही. ही वैविध्यपुर्ण संकल्पना स्वत: समवेत बरेच मुद्‌दे व गुतांगुत समाजात घेवून येत आहे.

भारतामध्ये कोणतेही नातेसंबंध नसलेल्या स्त्री व पुरूषामध्ये केवळ एकाच प्रकारचे नाते निर्माण होवू शकते. सामाजिकरित्या एकत्र येणा—या पद्धतीला ‘विवाह’ असे म्हणतात. विवाह हा एक धार्मिक विधी व पवित्र प्रकार समजला जातो, परंतु, विविध कारणांमुळे याची पवित्रता धोक्यात येत आहे. विवाह करण्याकरीता प्रेम असणं हे एकमेव कारण नाही, बहुतांशी जोडप्यांवर विवाह लादले जातात. यामुळे सहजीवन नातेसंबधासारख्या संकल्पना समाजात विवाहाला पर्याय म्हणून निर्माण झाल्या आहेत. परंतु आजकाल सहजीवन नातेसंबध हे पर्याय म्हणून राहिलेले नाहीत. हे नातेसंबंध समाजात आणि कायद्यात स्वत:चे वेगळे स्थान मिळवित आहेत.

**Concept of Live in relationship :**

The definition and ambit of live in relationship is not clear.

The 'live-in-relationship' is a living arrangement in which an un-married couple lives together in a long-term relationship that resembles a marriage.

Couple present themselves as spouse to the world.

'Live in relationship' means those relationship where there is no marriage between the parties, in the sense of solemnization of a marriage under any law. Yet the parties live as couple, represent to the world that they are a couple and there is stability and continuity in the relationship. Such a relationship is also known as a 'common law marriage'.

Common law marriage, sometimes called '*sui juris* marriage' (of one's own laws), informal marriage or marriage by habit and repute, is a form of interpersonal status that is legally recognized in limited jurisdiction as a marriage, even though no legally recognized marriage ceremony is performed or civil marriage contract is entered into or the marriage registered in a civil registry. A common law marriage is legally binding in some common law jurisdiction but has no legal consequence in others.[1]

A common law marriage, sometimes

**<u>'सहजीवन नातेसंबध' संकल्पना</u>** :

सहजीवन नातेसंबध या संकल्पनेची व्याख्या व व्याप्ती सुस्पष्ट नाही.

सहजीवन नातेसंबध म्हणजे जगण्यासाठी केलेली व्यवस्था की ज्या नातेसंबंधामध्ये अविवाहीत जोडपी एकत्र येतात आणि विवाह झाल्या प्रमाणे ब—याच कालावधीकरीता एकत्र राहतात.

अशा नातेसंबंधातील जोडपे स्वत:ला समाजासमोर विवाहीत जोडप्याप्रमाणे भासवतात.

विवाहातील धार्मीक विधी संपन्न न होता, विवाहातील नात्याप्रमाणे दोन व्यक्ती एकत्र राहतात, अशा प्रकारे एकत्र राहण्यास 'सहजीवन नातेसंबंध' म्हणतात. अशा जोडप्यामध्ये स्थैर्य, सातत्य आहे; असे ते समाजासमोर प्रदर्शित करतात, अशा नातेसंबंधाला 'कॉमन लॉ मॅरेज' असेही संबोधले जाते.

'कॉमन लॉ मॅरेज' याला काहीवेळेस *sui juris* मॅरेज (स्वत:च्या खाजगी कायदयाने चालणारा विवाह), अनौपचारीक विवाह, सवयीमुळे व लौकीकामुळे अस्तित्वात असलेला विवाह असेही ओळखले जाते. कायदेशिररीत्या मान्य असलेले कोणतेही विवाहविधी न करता, कोणताही समाजमान्य विवाह न करता असे नातेसंबंध समाजात दखलपात्र ठरतात. कॉमन लॉ मॅरेज हे काही देशांमध्ये कायदेशिररित्या ग्राहय मानले आहे, परंतू काही इतर देशांमध्ये अशा नातेसंबंधाना कोणताही कायदेशिर आधार मिळत नाही [१].

यामुळे कॉमन लॉ मॅरेजला *defacto marriage* (प्रत्यक्षात आहे, परंतु कायदयाच्या कक्षेत/नजरेत अस्तित्वात

called '*de facto* marriage' (in practice but not necessarily ordained by law).

Law and society are not alien to each other. They are the two faces of the same coin. One needs the other. Changes in society demand that law should move with the time. When this concept rooted in Indian society, then it urges for its meaning in the eyes of law. Hence the various High Courts of the country and the Hon'ble Supreme Court in a number of decisions tried to explain the concept of live in relationship. Laws are in the form of court verdicts which varies from case to case, therefore concept is also explained on the basis of various social problems before the court.

The Privy Council in *A Dinohamy v. W L Blahamy* [2] laid down the principle that "Where a man and a woman are proved to have lived together as a man and wife, the law will presume, unless the contrary be clearly proved, that they were living together in consequence of a valid marriage and not in a state of concubinage". Furthermore the Supreme Court granted legality and validity to a marriage in which the couple cohabited together for a period of 50 years. The Supreme Court held that in such a case marriage is presumed due to a long cohabitation. The same principle was reiterated in the case of *Mohabhat Ali v. Mohammad Ibrahim Khan* [3]

'Live in relationship' is an extra legal

नाही) असेही म्हटले जाते.

समाज आणि कायदा एकमेकांपासून भिन्न नाहीत. एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत. एकास दुस—याची गरज आहे. समाजात निर्माण झालेले बदल कायदयातही बदल होण्याची अपेक्षा करतात. भारतीय समाजव्यवस्थेत अशी नवीन नातेसंबंधाची संकल्पना रूजू होत असताना या संकल्पनेचा अर्थ अस्तित्वात असलेल्या कायदयामधून प्राप्त होणे आवश्यक ठरते. आपल्या देशातील विविध उच्च न्यायालये व मा. सर्वोच्च न्यायालयाने विविध न्यायनिर्णयातून सहजीवन नातेसंबधासारखे नातेसंबंध स्पष्ट केलेले आहेत.न्यायनिर्णय हे न्यायालयासमक्ष येणा—या परिस्थितीवर अवलंबुन असतात, त्यामुळे या नातेसंबंधाविषयी विचार स्पष्ट करताना न्यायालयांनी त्यांचे समक्ष असलेल्या सामाजिक प्रश्नांवर प्रतिक्रिया दिलेली आहे.

प्रिव्ही काऊन्सिलने ए. डिनोहामी विरूध्द डब्ल्यु.एल.ब्लाहामी[२] या खटल्यामध्ये असे मार्गदर्शक तत्व दिले आहे की, एखादी स्त्री व पुरूष एखादया नात्यामध्ये पती—पत्नी प्रमाणे राहत आहेत. या नातेसंबंधाविरोधात कोणतीही बाब सिद्ध झाली नाही, तर कायदा असे गृहीत धरतो की, त्या व्यक्ती कायदेशिर विवाहाप्रमाणे एकत्र राहत आहेत व ते कोणत्याही उपस्त्रीसंबंधातील (concubinage ) स्थितीत नाही.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने ५० वर्षे एकत्र राहीलेल्या जोडप्याला विवाहाप्रमाणे कायदेशिरता वैधता मिळावी असेही मान्य केलेले आहे. बराच काळ एकत्र राहणा—या जोडप्याला विवाहाप्रमाणे पती—पत्नी म्हणून गृहीत धरण्यात यावे, असे देखिल सर्वोच्च

concept, which already secured its stand in society and it is initiated in law by way of various rulings passed by the superior courts. Some of them are discussed below;

*Payal Sharma v. Superintendent, Nari Niketan, and others* [4] Justice M Katju and Justice R.B. Mishra stated, "In our opinion, a man and a woman, even without getting married, can live together if they wish to. This may be regarded as immoral by society, but is not illegal. There is a difference between law and morality."

The Delhi High Court, in a case *Alok Kumar v. State* [5] observed that a live in relationship is a walk in and walk out relationship. Justice S.N. Dhingra noted, "There are no legal strings attached to this relationship nor does this relationship create any legal-bond between the partners". The court further added, "People who choose to have live-in relationship cannot complain of infidelity or immorality as live-in relationships are also known to have been between a married man and unmarried woman or vice-versa"

In the case of *S. Khushboo v. Kanniammal* [6] , the Supreme Court gave its landmark judgment and held that there was no law which prohibits Live-in relationship or pre-marital sex. The Supreme court further stated that Live-in relationship is permissible only in unmarried major persons of heterogeneous sex.

न्यायालयामार्फत ठरविण्यात आले. हे मार्गदर्शक तत्व मोहबत अली विरूध्द मोहम्मद इब्राहीम खान[३] या न्यायनिर्णयात पुनरूच्चारीत करण्यात आले.

सहजीवन नातेसंबध ही संकल्पना कायदयाच्या कक्षेबाहेरील संकल्पना आहे. या नातेसंबंधाने आपले स्थान समाजात मिळविले आहे आणि आता विविध न्यायनिर्णयाद्वारे ते कायदयामध्ये स्थान मिळवित आहे. अशा प्रकारचे काही न्यायनिर्णय खालील प्रमाणे आहेत.

पायल शर्मा विरूध्द अधिक्षक नारी निकेतन आणि इतर[४] या याचिकेत न्यायमुर्ती एस.काटजू आणि न्यायमुर्ती आर. बी. मिश्रा यांनी असे म्हटले आहे की, ''आमच्या मते, एखादी स्त्री व पुरूष त्यांची इच्छा असल्यास विवाह केल्याखेरीज एकत्र राहू शकतात. असे नाते हे समाजाच्या दृष्टीने अनैतिक असू शकते, परंतु ते बेकायदेशिर नाही. कायदा व नैतिकता यामध्ये फरक आहे''

दिल्ली उच्च न्यायालयाने अलोककुमार विरूध्द राज्य[५] या न्यायनिर्णयामध्ये असे मत व्यक्त केले की, सहजीवन नातेसंबध हे अशा प्रकारचे नातेसंबंध आहेत की, ज्यामध्ये तुम्ही कधीही येवू (Walk in) आणि जावू (Walk out) शकता. असे नातेसंबंध कधीही बनविता येतात व कधीही तोडले जावू शकतात. या न्यायनिर्णयात न्यायमुर्ती एस. एन. डिंग्रा यांनी असेही म्हटले आहे की, या नात्यांना बांधणारा कोणताही कायदेशिर धागा नाही. त्याचप्रमाणे अशा सहचा—यांमध्ये कोणतेही कायदेशिर बंधन निर्माण होत नाही. न्यायालयाने पुढे असेही नमुद केले की, ज्या व्यक्तींनी सहजीवन नातेसंबधामध्ये राहणे पसंत केलेले आहे,

**Reasons behind live-in-relation :**

Couples cohabit, rather than marry, for a variety of reasons.

- They may want to test their compatibility before they commit to a legal union.
- They may want to maintain their single status for financial reasons.
- In some cases, such as those involving gay or lesbian couples, or individuals already married to another person, the law does not allow them to marry.
- In other cases, the partners may feel that marriage is unnecessary.
- Most of couples go for live-in relations because they hate to be divorced.
- Existed marriage is unsuccessful or legal and social difficulties arose in separation.
- Marriage may not be supported or not allowed by family due to interreligion, age difference etc.
- Sometimes they scared from responsibilities arose as a married partner, thereafter as a parents.
- Couple gives priority to the career rather than marriage. Therefore

अशा व्यक्ती कोणत्याही अनिष्ठतेची अथवा अनैतिकतेची तक्रार करू शकत नाही. कारण असे नातेसंबंध विवाहीत पुरूष व अविवाहीत स्त्रीमध्ये अथवा उलटपक्षी देखिल निर्माण होवू शकतात.

एस. खुशबु विरूध्द कान्निआम्मल[६] या याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने या संकल्पनेविषयी महत्वाचा न्यायनिर्णय दिलेला आहे. सहजीवन नातेसंबंध अथवा विवाहपुर्व शारीरीक संबंध यांना कोणत्याही कायदयाद्वारे बंदी नाही. परंतू असे नातेसंबंध अविवाहीत व विरूध्दलिंगी व्यक्तींमध्ये निर्माण झाले तरच त्यांना परवानगी देण्यात येईल.

**<u>सहजीवन नातेसंबंधामागील कारणे</u>**

एखादे जोडपे लग्न करण्यापेक्षा, एकत्र राहणे विविध कारणांमुळे पसंत करते.

१) विवाहासारख्या कायदेशिर बंधनात अडकण्यापुर्वी त्यांना स्वत:चा अनुरूपपणा पडताळून पाहायचा असतो.

२) आर्थिक नियोजनासाठी एकटे असण्याची स्थिती त्यांना महत्वाची वाटते.

३) काही जोडपी समलिंगी नात्यांमध्ये गुंतल्यानंतर,विरूध्दलिंगी व्यक्तींशी विवाह करतात. कारण समलींगी नाते हे बेकायदेशिर आहे. मग अशी विवाहबाहय समलिंगी जोडी सहजीवन नातेसंबधाद्वारे पुन्हा एकत्र येतात.

४) विवाह अनावश्यक आहे असे साथीदारास वाटते.

५) काही जणांना घटस्फोटाची, त्याच्या ठपक्याची, त्यांच्या परिणामांची

live-in-relationship is best option for them where there is no commitment and no time for partner.

- To escape the loneliness in their lives senior citizens have started preferring live in relationships.

A group of senior citizens under the banner of 'Jyeshtha Nagrik Live-In Relationship Mandal' Nagpur, led by a former banker Arvind Godbole has formed an organisation for helping those seeking a partner at the fag end of their lives.[7] Vina Mulya Amulya Seva (VMAS) Ahemedabad, the charitable trust which had organised this 'Senior Citizen Live-in Relationship Samellan', seven couples who met at this alliance meet have decided to enter into a live-in relationship.[8]

The concept had created a buzz in the social and media circles for the openness with which various aspects of taking up a live in partner by those who are alone in their twilight years. This initiative is to reduce the loneliness and the neglect and isolation that many such single senior citizens face in the evening of their lives. This is a welcome move by the seniors.

**Marriage versus Live in relationship**

Today’s India is changing at a pace that was socially unimaginable. Issue like ‘live-in relationship’ that was taken up by the western society are gradually

भिती वाटते.

६) अस्तित्वात असलेले लग्न अयशस्वी ठरते अथवा कायदेशिर किंवा सामाजिक दृष्टया विभक्त होण्यामध्ये अडथळे निर्माण झालेले असतात.

७) दोघांच्या वयामधील अंतरामुळे अथवा आंतरधर्मीय कारणांमुळे कुटुंबामध्ये विवाह मान्य नसतो.

८) विवाहातील जोडीदार अथवा त्यानंतर पालक बनल्यामुळे निर्माण होणा—या जबाबदा—यांपासून घाबरणा—या व्यक्ती अशा प्रकारच्या नातेसंबंधांना प्राधान्य देतात.

९) काही जोडपी विवाहापेक्षा करीअरला प्राधान्य देतात. त्यामुळे जिथे वेळ दयावा लागत नाही आणि बांधीलकीही नाही असे सहजीवन नातेसंबध हा त्यांच्यासाठी चांगला पर्याय बनतो.

१०)जिवनात आलेल्या एकटेपणा टाळण्याकरीता जेष्ठ नागरीक सहजीवन नातेसंबंधांना प्राधान्य देत आहेत.

जेष्ठ नागरी लिव्ह—इन रीलेशनशीप मंडळ, नागपूर ही संस्था निवृत्त बॅंक कर्मचारी श्री. अरविंद गोडबोले यांनी जेष्ठ नागरिकांकरीता स्थापन केली. आयुष्याच्या सरत्या काळात ज्यांना साथीदाराची गरज आहे अशा जेष्ठ नागरिकांना सदर संस्था साथीदार शोधण्यास मदत करते.[७] विना मूल्य अमूल्य सेवा, अहमदाबाद या धर्मादायी संस्थेने ‘जेष्ठ नागरीकांचे लिव्ह—इन रीलेशनशीप संमेलन’ भरवले होते. त्यामध्ये आलेल्या सात जोडप्यांनी

percolating into our social norms. Marriage is just another commitment. If people are shying away from marriages – one reason could be that people are scared of commitments that grow from marriage and are worried. Every relationship has its own advantages and disadvantages.

The law and society were traditionally biased in favour of marriage. Public policy supports marriage as necessary to the stability of the family; the basic societal unit. To preserve and encourage marriage, the law reserves many rights and privileges to married persons. Cohabitation carries none of those rights and privileges. It can be said that cohabitation has all the headaches of marriage without any of its benefits.

Act of Live-in relationship is understood to be without mutual statutory obligations towards each other. Both parties enter into such relationship with full understanding of the situation. Hence awarding maintenance or recognising rights out of such relation will be equating them with husband and wife. Further long cohabitation leads to presumption of valid marriage which must not be extended to live-in-relation. These couples face some of the same legal issues as married couples, as well as some issues that their married friends never acquainted. Both parties who dare to enter into such relations are all educated class and can not complain

सहजीवन नातेसंबंधाचा पर्याय निवडला.[८]

**<u>विवाह विरूध्द सहजीवन नातेसंबध</u> :**

आजचा भारत देश सर्वांगाने अगदी सामाजिक दृष्टीकोनाने देखील बदलत आहे, सहजीवन नातेसंबधांसारखी विदेशामध्ये रूजलेली संकल्पना आज भारतीय समाजातही स्थान मिळवित आहे. विवाह म्हणजे एक बांधीलकी आहे. व्यक्ती विवाह करायला संकोचतात, त्याचे एक कारण असेही असू शकते की, त्या व्यक्ती विवाहापासून उद्‌भवणा—या बांधीलकीला घाबरतात अथवा त्याविषयी चिंता करतात. प्रत्येक नात्याचा काही फायदा व नुकसानही असते.

पौराणिक दृष्टीकोनानुसार कायदा व समाज हा विवाहाच्या पक्षात आहे. समाजातील नियम व कौटुंबिक स्थैर्य जपण्याकरीता विवाह महत्वाचा मानला जातो. विवाहासारख्या संकल्पनेला प्रोत्साहन देण्यासाठी कायदा विवाहीत व्यक्तीस हक्क व सुविधा प्राप्त करून देतो. केवळ एकत्र राहील्यामुळे हक्क व सुविधा प्राप्त होत नाहीत. एकत्र राहण्यामध्ये विवाहामुळे होणारे सर्व त्रास आहेत, त्याचवेळेस विवाहामुळे मिळणारे फायदे मात्र अशा नात्यांमध्ये मिळत नाही.

सहजीवन नातेसंबंध हे नातं असं आहे की, त्यामध्ये एकमेंकांच्या सहमतीने अथवा कायद्याने कोणतेच बंधन नाही. या नात्यांना निवडणा—या जोडप्यांना या नात्याचे कायदेशिर व सामाजिक स्वरूप माहीत असते. त्यामुळे अशा जोडप्यांना पोटगीचे किंवा इतर हक्क दिले गेले तर त्यांना पती—पत्नी या नात्याला समांतर आणल्या सारखे होईल. बराच काळ

or claim any rights on each other's property.

It threatens the notion of husband and wife and the cognition of marriage that enjoys high level of sanctity when it comes to India. It also tends to crop up adultery, as there is no such proscription that live in partners should be unmarried. Thus, a person might be married and be lived with someone else under the garb of live in relationship.

If the rights of a wife and a live-in partner become equivalent it would promote bigamy and it would arose a conflict between the interests of the wife and the live-in partner. This promotes bigamy, as the person who is getting into live in relationship might be already married. The position of the wife is disadvantageous in such situation. While the right of legally wedded wife remains at stake, the right of live in female partner too does not become secure.

For instance Payal Katara v. Superintendent, Nari Niketan Kandri Vihar Agra and Others[9], here Rajendra Prasad, the person with whom plaintiff was living in was already married. While the court recognized the right of cohabitation of the plaintiff, what about the right of the wife of the person with whom plaintiff was cohabiting. The question that seeks an answer with the elevation of live in relationship is what will be the status of wife, if a person who is in live in relationship is already

एकत्र राहीलेल्या जोडप्यांचा वैध विवाह झाला आहे असे गृहीत धरले, तरीही ते सहजीवन नातेसंबधामध्ये आहेत असे म्हणता येणार नाही. कायदयाच्या नजरेत वैध विवाह गृहीत धरणे आणि सहजीवन नातेसंबध या दोन संकल्पना वेगळया आहेत. अशा नाते संबंधातील जोडप्यांमधील काही कायदेशिर समस्या या विवाहीत जोडप्यांमध्येही आढळून येतात. विवाहित जोडप्यांना ज्या समस्यांना तोंड दयावे लागते, तशा काही समस्या अशा जोडप्यांच्या वाटयाला येत नाहीत. सहजीवन नातेसंबध एकत्र येणा—या व्यक्तींपैकी बहुतांशी जण सुशिक्षीत असतात, त्यामुळे ते एकमेकांविरोधात तक्रार करू शकत नाहीत किंवा एकमेकांच्या मिळकतीमध्ये हक्क सांगू शकत नाहीत.

भारताच्या बाबतीत म्हणायचे तर असे नातेसंबंध; विवाहासारख्या धार्मिक व पवित्र संकल्पनांच्या आणि पती—पत्नी या नात्याच्या विरोधात एक प्रकारची भिती आहे. व्यभिचारासारखे प्रकार देखिल अशा नातेसंबंधामुळे पसरू शकतात. कारण सहजीवन नातेसंबधामधल्या व्यक्ती अविवाहीतच असतील असे नाही. एखादी विवाहीत व्यक्ती सहजीवन नातेसंबधाच्या नावाखाली कोणत्याही अन्य व्यक्तीबरोबर राहू शकेल.

पत्नी व सहजीवन नातेसंबधामधली स्त्री यांचे अधिकार एकाच पातळीवर आले तर द्विभार्या पद्धतीस प्रोत्साहन मिळेल. त्याचप्रमाणे पत्नीचे हक्क आणि सहजीवन नातेसंबधामधल्या स्त्रीचे हक्क या दोघांमध्ये गुंतागुंत निर्माण होईल. विवाहीत पुरूष सहजीवन नातेसंबंधात गुंतुन द्विभार्यासारख्या प्रथेला प्रोत्साहन देतो. अशा परिस्थीतीत पत्नीच्या

married as law also seek to protect the right of live in partner under statutes like Protection of Women from Domestic Violence Act, 2005.

Even if rights of maintenance etc. are provided to the live in female partner, there is no guarantee that she can actually avail those rights. Marriage grants social recognition, but there is no proof of live in relationship; a person can easily deny the fact of live in relationship to evade liability. In sum and substance the rights of woman remains precarious.

The children born under such relationship, although are recognized under Hindu Marriage Act, 1955. However, it is submitted that the couples who tend to disobey the socially recognized social tenor cannot be supposed to be people of only one religion or to be the one professing Hinduism. In fact, many a time, because of family’s opposition to inter-religion and inter-racial marriage, couple prefers to get into live in relationship and hence forth circumventing family objection.

Such relationships are fragile and can be dissolved any moment, there is no obligation and bondage, legal position with respect to live in relationship does not portray a discernible image. The social status and sanction as enjoyed by Married Couples is not enjoyed by couples in a live-in relationship.

Conflict is a part and parcel of any

दर्जावर परीणाम होईल. कायदेशीर विवाहीत पत्नीच्या हक्कांना अशा नातेसंबंधामुळे बाधा पोहोचतेच. परंतु त्याच वेळेस सहजीवन नातेसंबंधामधल्या स्त्री जोडीदाराचे हक्कही सुरक्षित नसतात.

उदाहरणार्थ पायल कटरा विरूध्द अधिक्षक नारी निकेतन आणि इतर[१]. या खटल्यामध्ये याचिकाकर्ती ही राजेंद्र प्रसाद या विवाहीत व्यक्तीशी सहजीवन नातेसंबंधामध्ये राहत होती. यामध्ये त्यांचा एकत्र राहण्याचा हक्क न्यायालयाने विचारात घेतला. परंतू राजेंद्र प्रसादच्या पत्नीच्या हक्काविषयी काय? अशा सहजीवन नातेसंबंधाना प्रोत्साहन दिले तर पत्नीच्या हक्कांविषयी निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. कारण कौटुंबिक हिसांचारापासून स्त्रीयांचे संरक्षण कायदा २००५ नुसार, एक प्रकारे सहजीवन नातेसंबधामधील स्त्रीच्या हक्कांचा विचार करण्यात आला आहे.

पोटगीचे हक्क सहजीवन नातेसंबंधातील स्त्रीस प्राप्त झाले तरीही त्यांचा वापर ती करेल असे खात्रीलायक नाही. सहजीवन नातेसंबंधातल्या जोडीदाराचा मृत्यू झाल्यास अथवा असे नातेसंबंध संपुष्टात आल्यास; अशा परिस्थितीमध्ये अन्य जोडीदारास कोणते हक्क प्राप्त होतील हा प्रश्न आहे. वारसा हक्काचा अथवा पोटगीचा कोणताही कायदा अशा जोडीदारांसाठी उपलब्ध नाही.

हिंदू विवाह कायदा १९५५ नुसार अशा नातेसंबंधातून जन्मलेल्या मुलांचे हक्क सुरक्षित आहेत. परंतु अशा नातेसंबंधाने एकत्र येणा—या व्यक्ती समाज व धर्म मानत नाहीत. त्यामुळे दोघ ाांपैकी एक हिंदू धर्माचे आचरण करत

relationship.

**International scenario :**

Live in relationship in various countries is either recognized as it exists or it's finding recognition via implied provisions of different statutes that protect property rights, housing rights. Many countries provide for live in relationship contracts in which partners can determine their legal rights. However, when it comes to the right of child born under such relationship, law of various countries excludes a uniform tenor of protecting their rights. Thereby, discouraging attempts of live-in relationships with legal sanction.

In United States of America exists the concept of 'Cohabitation Agreements' containing the explicit mention of rights and liabilities under such agreements. In USA the expression 'palimony' was coined which means grant of maintenance to a woman who has lived for a substantial period of time with a man without marrying him, and is then deserted by him. Palimony is a compound word made by 'pal' and 'alimony'. The first decision on palimony was the well known decision of the California Superior Court in *Marvin vs. Marvin* [10]. This case related to the famous film actor Lee Marvin, with whom a lady Michelle lived for many years without marrying him, and was then deserted by him and she claimed palimony. Subsequently in many decisions of the

नसेल तर त्यांना कायदयाच्या चौकटीत आणणे देखिल कठिण राहते. बहुतांशी सहजीवन नातेसंबंधामधल्या व्यक्ती आंतरधर्मीय – आंतरजातीय असतात व त्यांना त्यांच्या कुटुंबाचा विरोध असतो.

असे नातेसंबंध क्षणीक असतात व ते कोणत्याही वेळेस तुटण्याची भीती राहते. कारण यामध्ये बंधन, जबाबदारी, कायदा नसल्याकारणाने सहजीवन नातेसंबंध आदरयुक्त, प्रतिमा निर्माण करू शकत नाही. विवाहीत जोडीदारांना समाजात जे स्थान आहे, ते स्थान सहजीवन नातेसंबंधातल्या जोडीदारांना मिळत नाही.

वाद हा प्रत्येक नात्यातल्या अविभाज्य भाग आहे.

**आंतरराष्ट्रीय चित्र** :

बहुतांशी देशांमध्ये सहजीवन नातेसबंधांना त्यांच्या अस्तित्वानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. या नात्यांना मिळकतीचे हक्क, घराचे हक्क अशा विविध हक्कांना कायद्यायातील काही तरतुदींनुसार दिलासा देण्यात आलेला आहे. काही देशांमध्ये सहजीवन नातेसंबंधात एकत्र येण्यापुर्वी जोडीदारांच्या हक्कांविषयी कायदेशीर करार करण्यात येतो. या नातेसंबंधात जन्मलेल्या मुलांना विविध देशांमध्ये विविध प्रकारे कायदयाचे संरक्षण मिळते. सर्वसामान्यपणे सहजीवन नातेसंबंधांना कायदयाच्या चौकटीत आणण्याकरीता सर्वत्र प्रयत्न झाले आहेत पण ते यशस्वी ठरलेले नाहीत.

अमेरीकेमध्ये 'सहवास करार'

Courts in USA, the concept of palimony has been considered and developed. The US Supreme Court has not given any decision on whether there is a legal right to palimony, but there are several decisions of the Courts in various States in USA. These Courts in USA have taken divergent views, some granting palimony, some denying it altogether, and some granting it on certain conditions. Hence in USA the law is still in a state of evolution on the right to palimony.

In *Taylor vs. Fields* [11] the facts were that the plaintiff Taylor had a relationship with a married man Leo. After Leo died Taylor sued his widow alleging breach of an implied agreement to take care of Taylor financially and she claimed maintenance from the estate of Leo. The Court of Appeals in California held that the relationship alleged by Taylor was nothing more than that of a married man and his mistress. It was held that the alleged contract rested on meretricious consideration and hence was invalid and unenforceable. The Court of Appeals relied on the fact that Taylor did not live together with Leo but only occasionally spent weekends with him. There was no sign of a stable and significant cohabitation between the two.

In <u>China</u> couples also sign a contract for live-in relationship. The child born through such relationships enjoys the same succession and inheritance rights as are enjoyed by children born through

(cohabitation agreement) ही संकल्पना अस्तित्वात आहे. या प्रकारच्या करारामध्ये जोडीदाराची कर्तव्ये व जबाबदारीविषयी स्पष्टपणे नमुद केलेले असते. अमेरीकेमध्ये पोटगीशी समर्पक 'पॅलीमनी' ही संकल्पना प्रचलित आहे. पॅलीमनी म्हणजे अशा स्त्रीला मिळणारी पोटगी की जी एखादया पुरूषाबरोबर विवाह न करता काही कालावधीकरीता एकत्र राहीलेली आहे आणि त्यानंतर त्या पुरूषाने तिचा त्याग केलेला आहे. पॅलीमनी संदर्भात पहिला न्यायनिर्णय कॅलिफोर्निआ सुपिरीअर कोर्टामार्फत मार्विन विरूध्द मार्विन[१०] या खटल्यात देण्यात आला. हा खटला प्रसिद्ध चित्रपट कलाकार ली मार्टीन व त्याच्या समवेत राहणा—या मिशेल यांच्याविषयी होता. मिशेल या मार्टीन समवेत विवाह न करता ब—याच कालावधीकरीता एकत्र राहीलेल्या होत्या. मार्टीन यांनी त्यांचा त्याग केल्यानंतर त्यांनी पोटगीची मागणी केली होती. त्यानंतर विविध न्यायनिर्णयाद्वारे 'पॅलीमनी' ही संकल्पना अमेरिकेत रूजली आणि तिचा प्रसार झाला. अमेरीकेच्या सर्वोच्च न्यायालयाने पॅलीमनीचा हक्क कायदेशिर आहे किंवा नाही याबाबत कोणताही न्यायनिर्णय दिलेला नाही. परंतू पॅलीमनी संदर्भात अमेरिकेतल्या विविध राज्यामधील न्यायालयामार्फत न्यायनिर्णय देण्यात आलेले आहेत. तेथील काही न्यायालयांनी पॅलीमनी संकल्पना संपूर्ण किंवा सशर्त मंजुर केली आहे, तर काही न्यायालयांनी ती फेटाळली आहे. त्यामुळे पॅलीमनी या संकल्पनेचा अमेरिकेमध्ये विकास होत आहे.

टेलर विरूध्द फील्डस [११] या दुस—या खटल्यामध्ये टेलर या याचिकाकर्तीचे लिओ या विवाहीत

marriages.

The concept is well substantiated and given the most vital force in France wherein two adults of opposite sex or same sex can enter into an agreement to live together and organize their lives and thereby enjoy the rights of a married couple and also work towards social welfare. Such agreement can be revoked by both or either of the parties by giving three months prior notice to the other party. Such agreements or pacts are popularly known as "*pacte civil de solidarite*" (civil solidarity pacts). The legal status of the pact was passed by the French National Assembly in 1999 and allowed couples to enter into agreements for a social union.

In the UK, live in couples does not enjoy legal sanction and status as granted to married couple. There is no obligation on the partners to maintain each other. Partners do not have inheritance right over each other's property unless named in their partner's will. As per a 2010 note from the Home Affairs Section to the House of Commons, unmarried couples have no guaranteed rights to ownership of each other's property on breakdown of relationship. However, the law seek to protect the right of child born under such relationship. Both parents have the onus of bringing up their children irrespective of the fact that whether they are married or cohabiting.[12]

पुरूषाशी सहजीवन नातेसंबंध होते. लिओ यांच्या मृत्यूनंतर टेलरने त्याच्या पत्नीच्या विरोधात दावा दाखल केला. टेलरच्या म्हणण्यानुसार तिची आर्थिक जबाबदारी अलिखीत कराराद्वारे लिओवर होती व त्याचा भंग झालेला आहे. म्हणून लिओच्या संपत्तीमधून तिला पोटगी मिळण्याचा हक्क आहे. कॅलिफोर्निया मधील कोर्ट ऑफ अपिल ने असे ठरविले की, टेलर ही दुसरी कोणीही नसुन विवाहीत पुरूषाबरोबर राहणारी त्याची प्रिया (mistress) आहे. टेलर कथन करीत असलेला करार हा व्यभिचाराशी संबंधीत आहे. त्यामुळे तो अवैध व अंमलबजावणीजोगा नाही. न्यायालयाने असेही ठरविले की, टेलर व लिओ एकत्र राहत नव्हते. त्यांनी केवळ काही साप्ताहिक सुट्टया एकत्र घालविल्या, त्यांच्यामध्ये स्थिर व महत्वपूर्ण असा सहवास नव्हता.

चीनमध्ये देखिल जोडीदार सहजीवनाकरीता लेखी करार करतात, या नातेसंबंधातून जन्मलेल्या मुलांना वारसा हक्क; विवाहापासून जन्मलेल्या मुलांप्रमाणेच मिळतो.

फ्रान्समध्ये नातेसंबंधाचे हे नवीन स्वरूप; स्वतंत्र व ठाम स्थान बाळगून आहे. फ्रान्समध्ये विरूध्द अथवा समलिंगी जोडीदार एकमेंकाबरोबर राहण्याकरीता लेखी करार तयार करू शकतात. ज्यामध्ये ते त्यांचे सहजीवन व्यतित करण्याविषयीचे नियोजन नमुद करू शकतात. तीन महिने पुर्वसूचना दिल्यानंतर एखादया अथवा दोन्ही जोडीदारामार्फत सदर करार रद्द करता येवू शकतो. अशा प्रकारच्या कराराला *"pacte civil de solidarite"* म्हणजेच 'नागरी एकता करार' असेही म्हणता येईल. वर्ष १९९९ मध्ये फ्रेंच नॅशनल असेंब्लीने करारास कायदेशीर

**Law in India relating to live in relationship in respect of woman and their children :**

As we know that law is not a means to maintain law and order in the society, but it is also the means of providing social justice. We are also aware that the law does not operate in vacuum. It operates in society, which is itself influenced by various factor such as social structure. Law is not for law sake. Law is an instrument of social control.

